जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे येथे ५७४ खाटांचे जिल्हा रूग्णालय , संदर्भ सेवा रूग्णालय व परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह इमारत बांधकामाच्या अंदाज पत्रकास व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१९/प्र.क्र.१५१/आ-३अ
गो.ते. रूग्णालय, संकुल इमारत, १० वा मजला
नवीन मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
दिनांक : १३ जून, २०१९

वाचा -

१) सा.आ.वि.शासन निर्णय क्रमांकः जिरूठा- २०१८/प्र.क्र.३५/आ-३अ, दिनांक ९.०३. २०१८
२) सा.आ.वि.शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २०१५/प्र.क्र. ४०९/ आ-३अ, दिनांक १७.०७.२०१८
३) सा.आ.वि.शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ४३/आ-३अ, दिनांक २७.२.२०१९
४) सह संचालक (रूग्णालये राज्यस्तर) आरोग्य सेवा संचलनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/ कक्ष-३/ टे-६/ ठाणे ५७४ खाटासंसेरू सहबांध/७२९०-९१ दिनांक २९.५.२०१९ रोजीचे पत्र.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील सचिव स्तरीय समितीच्या दिनांक १०.६.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

ठाणे येथील जिल्हा सामान्य रूग्णालय येथे १०० वर्षापूर्वीच्या ब्रिटीश कालीन इमारतीत कार्यरत असून रूग्णालयाच्या काही इमारती अतिशय जीर्ण व वापरण्यास अयोग्य असल्यामुळे जुन्या इमारती पाडण्याबाबत दिनांक ९ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तद्दनंतर ठाणे जिल्हा सामान्य रूग्णालय येथे ५७४ खाटांचे जिल्हा रूग्णालय व संदर्भ सेवा रूग्णालय (सुपर स्पेशालिटी रूग्णालय) सुरू करण्यास दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सह संचालक, (रूग्णालय राज्यस्तर) आरोग्य सेवा संचालनालय यांच्याकडून ठाणे जिल्हा सामान्य रूग्णालय येथे ५७४ खाटांचे जिल्हा रूग्णालय व संदर्भ सेवा रूग्णालय (सुपर स्पेशालिटीसह) व परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह इमारत बांधकामाची अंदाज पत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आले होते. सदर बांधकामाची किंमत रू. १५.०० कोटीपेक्षा जास्त असल्याने सदर प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीपुढे सादर करण्यात आला असता सदरहू बांधकाम करण्यास समितीने दिनांक १०/६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदरहू कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे येथे ५७४ खाटांचे जिल्हा रूग्णालय , संदर्भसेवा रूग्णालय व परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह या इमारतीच्या बांधकामाच्या रू. ३१४११.२९ लक्ष

(अक्षरी रूपये तिनशे चौदा कोटी अकरा लक्ष एकोणतीस हजार फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रके व आराखडे यास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर बांधकामावरील खर्चाच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेत:-

RECAPITULATION SHEET					
Sr. No.	**Particulars of Scope**	**Unit Rate Norms Rs. Per (Sqmt./Meter/Lumpsum Etc.)**		**Cost Rs.**	
		Sqmt/Rmt/ Lumpsum etc.		**Component Wise**	**Total**
A	**ESSENTIAL ITEMS (COMPONENTS)**				
1	(a) Building proper (Built Up Area - Sq.m)				
	Basement	6067.94	41745.00	253306155.30	
	Ground floor (Including Plinth Protection)	4734.32	41745.00	197634188.40	
	1st floor	4689.32	28108.00	131807406.56	
	2nd floor	4689.32	28387.00	133115726.84	
	3rd floor	4689.32	28665.00	134419357.80	
	4th floor	4689.32	28943.00	135722988.76	
	5th floor	4689.32	29222.00	137031309.04	
	6th floor	2988.97	29500.00	88174615.00	
	Nurses Training centre and Hostel	5500.00	29500.00	162250000.00	
	Total B.U.A. =	**42737.83**		**Sub Total (a)**	**1373461748.00**
	(b) Fuel Gas Pipeline + Centralize O2 Gas			30000000.00	
	(c) Bio Digester			10000000.00	
	(d) Rain/ roof water harvesting			2788596.00	
	(e) Solar roof top (MoU to be executed)*			10793000.00	
	(f) Ramp for handicaps			1000000.00	
	(g) Furniture	36670.00	9988.00	366259960.00	
	Sub Total (b+c+d+e+f+g)				**420841556.00**
2	Water Supply & Sanitary Works		5% of (a)	Sub Total (2)	**68673087.00**
3	a) Electrification (As per estimate attached)			91728305.00	
	b) Fire fighting Arrangements etc.(As per estimate attached)			84251964.00	
				Sub Total (3)	**175980269.00**
			Sub Total (A)		**2038956660.00**
B	**MISCELLANEOUS ITEMS**				
	(I) Demolition of existing building			8000000.00	
	(II) Compound wall & Gate (Rmt.)	716.00	35970.00	25754520.00	
	(III) Internal Roads (Rmt.)	1000.00	28355.00	28355000.00	
	(IV) Development of ground			1000000.00	
	(V) Parking Area	1200.00	2880.00	3456000.00	
	(VI) Retaining Wall			0.00	

	(VII) Land Scaping Gardens			8000000.00	
	(VIII) Soil Investigations & Detail Land Survey			4000000.00	
	(IX) CC Drains and CD Works	716.00	23290.00	16675640.00	
	(X) Sewage Treatment Plant (2 Nos)			13000000.00	
	(XI) Parking Sheds for Vehicles (2 Nos)			5000000.00	
	(XII) Flag Post (2 Nos)			400000.00	
	(XIII) Temporary Sheds for office room at site (2 Nos)			1000000.00	
	(XIV) Vertical Stack Parking (100 Vehicles)			20000000.00	
	(XV) Autocad drawings, Photographs, video shooting (2 Nos)			3500000.00	
	(XVI) Add 3 % on Building cost (a) for Approval of other Department & Local Bodies			41203852.00	
	(XVII)Connecting Bridge between hospital and super speciality hospital			10000000.00	
			Sub Total (B)		**189345012.00**
	Sub Total (A) = (1) + (2) + (3) + (B)				**4267258332.00**
C	**OPTIONAL ITEMS**				
1	Water Tank, Fire fighting water tank, Bore well & Pump House (2 Nos each)			30000000.00	
2	Air Conditioning			100836645.00	
3	Lifts			21000000.00	
4	External Toilets			6000000.00	
5	AB Room, area lighting, pupms, generator			77236717.00	
6	CCTV			10000000.00	
			Sub Total (C)		**245073362.00**
		Project Cost (P)= (A)+(B)+(C)			**2473375034.00**
D	**PROVISIONS**				
	(I) Contingencies 4% on (a)			54938469.92	
	(II) Green Building 5% on (a)			68673087.4	
	(III) GST 12% on (P)			296805004.1	
	(IV) Price Escalation 10% on (P)			247337503.4	
			Sub Total (D)		**667754064.8**
	Total Project Cost (TPC) (A + B + C + D)				**3141129098.80**
	Say Rs. Lakhs				**31411.29**

अटी व शर्ती:-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२) इमारतीचे बांधकाम सुरु करण्यापुर्वी सदर नकाशा वास्तुशास्त्रज्ञ, सा.बा.विभाग मुंबई यांचेकडून मंजुर करुन घ्यावे.

३) उपरोक्त कामाची निविदा काढतांना प्रत्येक कामाची स्वतंत्रपणे निविदा न काढता नमूद सर्व कामांसाठी एकच निविदा काढण्यात यावी.

४) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

५) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाची किंमत वाढणे शक्य असल्यामुळे त्यासाठी आवश्यक प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्यात्या- भागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करुन घ्यावेत.

६) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना आरोग्य खात्याच्या त्यात्या- आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

७) सदरचे काम नवीन नमुना नकाशांप्रमाणे करावयाचे झाल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने नियुक्त केलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञामार्फत नकाशांप्रमाणे वास्तुमांडणी आराखडा मंजूर करुन घेण्यात यावा. तसेच स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सदर नवनियुक्त वास्तुशास्त्रज्ञ व जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. तसेच ही परवानगी मागण्यासाठीचा पत्रव्यवहार जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या स्वाक्षरीने करण्यात यावा.

८) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य/ उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञाकडून या कामांच्या नकाशे व वास्तुमांडणी आराखड्यांना वेगळ्या मंजूरीची आवश्यकता नाही.

९) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१०) उपरोक्त कामे सदर रक्कमेत पूर्ण होतील यांची दक्षता घ्यावी.

११) काम सुरू करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तु विशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.

१२) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करूनच काम हाती घ्यावे.

१३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. बीडीजी -२०१७/ प्र.क्र. ६०/ इमा-२, दि. ७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

१५) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्य निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. जिल्हा सामान्य रूग्णालय व संदर्भसेवा रूग्णालय २ स्वतंत्र इमारतीत कार्यान्वित होतील जिल्हा सामान्य रूग्णालय हे तळ मजला +५ व संदर्भसेवा रूग्णालय, वसतीगृह, परिचारीका प्रशिक्षण केंद्र तळ मजला + ६ या इमारतीत राहील सुयोग्य नियोजन करून टप्याटप्याने बांधकाम हाती घेण्यात यावे.

४. जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे येथे ५७४ खाटांचे जिल्हा रूग्णालय , संदर्भसेवा रूग्णालय व परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह इमारत बांधकामावरील खर्च मागणी क्रमांक- एच- ८, मुख्यलेखाशिर्ष "४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य सेवा यावरील भांडवली खर्च, ०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य) ११० - रूग्णालये व दवाखाने, (०१) (अ) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- इमारती, (००)(०१) मोठी बांधकामे (४२१०००१४), ५३- मोठी बांधकामे" याखाली भागविण्यात यावा.

५. जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे येथे ५७४ खाटांचे जिल्हा रूग्णालय , संदर्भसेवा रूग्णालय व परिचारीका प्रशिक्षण केंद्र आणि वसतीगृह इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्वरीत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय दिनांक १० जून, २०१९ रोजी झालेल्या उच्च स्तरीय सचिव समिच्या बैठकीच्या कार्यवृत्तास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७३१२६४८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.06.13 18:20:39 +05'30'

(रा.शा. कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेते महाराष्ट्र विधान सभा/ विधान परिषद विधानमंडळ सचिवालय मुंबई.
३. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

५. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. सह संचालक (रूग्णालये राज्यस्तर) आरोग्य सेवा संचलनालय, मुंबई
८. उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ , ठाणे.
९. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय, ठाणे.
१०.जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
१० वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
११ अवर सचिव (इमारती-१), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२ अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३ निवड नस्ती (कार्यासन आरोग्य -३ अ).